मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
४५८८

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क्र. ४५८८

BVBK-0404588

# ध्येयराजा

. सं. वाचनालय, ठाणें
…षय बा.वा.
…क्र. ४५८८



विजय प्रकाश

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

30 MAY 1975

# थोटा राजा

: लेखक :


गो. वि. नामजोशी

साहित्य विशारद



ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.


किंमत ४ आणे


BVBK-0404588



विजय प्रकाशन—मुंबई

— प्रकाशक —
सा. ना. सारंग,
बी. आय्. टी. चाळ, नं. ४
परळ, मुंबई १२

आवृत्ति पहिली सन १९५१
आवृत्ति दुसरी सन १९५४

[ सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन ]

— मुद्रक —
मधुकर रघुनाथ कालेवार,
प्रफुल्ल प्रिंटिंग प्रेस,
नानाशंकरशेट वाडी,
३८० ई, गिरगांव रोड, मुंबई

# थोटा राजा

फार फार वर्षांपूर्वी एक राजा होता. त्याचें आपल्या प्रजेवर अतिशय प्रेम होतें. आपल्या मुलाप्रमाणें तो प्रजेवर प्रेम करी. सगळे लोक आनंदांत असत.

एकदां राजा आजारी पडला. सर्व प्रजेला अतिशय दुःख झालें. थोड्या दिवसांनीं राजा मरण पावला. राजाला एक मुलगा होता. तो लहान असल्यामुळें त्याला बाळ राजा म्हणत. बाळ राजाला शिकारीचा नाद होता. तो रोज शिकारीस जाई. त्याचें प्रजेकडे मुळींच लक्ष नसे. त्याला प्रजा कंटाळली होती.

बाळ राजा एकदां शिकारीस गेला होता. राजा व बरोबरचे लोक खूप हिंडले. इतक्यांत एक लांडगा त्यांना दिसला.

राजानें बंदुकीचा नेम धरला पण त्याच वेळेस लांडग्यानें उडी मारल्यामुळें गोळी चुकली. लांडगा रागानें पुढें येत होता. पण एका सरदारानें आपला भाला मारला. राजानें तलवारीनें लांडग्यावर वार केला. त्या सरदाराच्या भाल्यानें लांडगा अर्धमेला झाला होता. राजाच्या तलवारीच्या वारानें तो पुरता मेला. दुसरा सरदार म्हणाला, 'महाराज, आपल्या तलवारीनें अगदीं बरोबर काम केलें.' राजा हंसला.

राजाला तहान लागली होती. ते पाण्यासाठीं इकडे तिकडे फिरत असतां त्यांना रानांत एक झोपडी दिसली. राजा त्या

झोपडीकडे निघाला. त्याचे सरदार त्याच्या पाठीमागून येत होते. झोपडीचे पुढें अंगण होतें. अंगणांत एक मनुष्य मांडी घालून बसला होता. त्यानें दाढी वाढविली होती. राजानें विचारलें ‘ कोण रे तूं ? आम्ही दिसतांच उभा कां नाहीं राहिलास ? ’

तो साधु होता. साधु देवाचें ध्यान करीत होता. त्याला राजाचे शब्द ऐकूं गेले नाहींत. तो तसाच बसला होता. साधु बोलला नाहीं म्हणून राजाला जास्तच राग आला. राजा पुढें होऊन म्हणाला, ‘ बोललास नाहीं तर थोबाडींत मारीन. ’ काय बोलणार ! तो ध्यानस्थ होता. राजानें साधूच्या एक थोबाडींत मारली. साधु बाजूला पडला. राजाला गंमत वाटली. त्यानें मिशीवरून हात फिरविला.

‘ ज्या हातानें तूं माझ्या थोबाडींत मारलीस, तो तुझा हात सूर्य मावळतांच गळून पडेल. यापुढें नीट वाग. नाहींतर एक वर्षानें दुसराहि हात गळून पडेल. ’

राजाला त्याचें म्हणणें खोटें वाटलें. इतक्यांत एक म्हातारा सरदार पुढें येऊन म्हणाला, ‘ महाराज आपण जाऊं या. साधूचे शाप खोटे होत नाहींत. ’ राजा म्हणाला ठीक. जाऊं या. राजा साधूला म्हणाला ‘ पुढील वेळीं परत येईन व याच हातानें तुला शिक्षा करीन. ’

राजा निघाला. इतर लोकहि निघाले. रथ चालूं लागला. रथ राजवाड्यांत आला. सरदारांकडून ही हकिगत प्रधानजीला

कळली. तो राजाला भेटावयाला आला. राजानें हकिगत सांगितली, पण आपला हात गळून पडेल असें त्यास वाटत नव्हतें.

राजाचे इतर उद्योग नेहमीप्रमाणें घडले. हळू हळू संध्याकाळ होत होती. सूर्य मावळण्याची वेळ होत आली. सगळ्यांचें लक्ष राजाकडे लागलें होतें, इतक्यांत राजाचा हात गळून पडला. राजा ओरडला. 'अरेरे ! हें काय झालें ! देवा कायरे केलेंस हें ! ओय् हात दुखतो.' सगळ्यांना मोठें नवल वाटलें. राजाचा हात गळलेला पाहून सर्वांना फार वाईट वाटलें.

'मी वाईट वागलों त्याबद्दल मला शिक्षा मिळाली. प्रधानजी, तुम्ही मोठे अहां, हुशार अहां. मी आतां काय करूं हें तुम्हीच मला सांगा. त्या साधूला मी विनाकारण मारलें. माझा हात गेला.' राजाच्या डोळ्यांत पाणी आलें, प्रधान म्हणाला 'असा धीर सोडून कसें चालेल ? पण यापुढें जास्त चांगलें वागलें पाहिजे. नाहीं तर एक वर्षानें दुसराहि हात गळून पडेल. महाराज, चांगलें वागलें तर सर्व कांहीं चांगलें होईल; आपला गेलेला हातहि परत येईल.'

तेव्हां राजा म्हणाला 'प्रधानजी, आपण सांगाल त्याप्रमाणेंच वागेन.'

'मग महाराज, आपण उद्यांच त्या साधूकडे जाऊं. तोच यांतून चांगला मार्ग दाखवील.' प्रधानजी म्हणाला.

दुसऱ्या दिवशीं राजा व प्रधानजी रथांत बसून निघाले. राजा कालच्यासारखा आनंदांत नव्हता. हात गळून गेल्यामुळें त्याला वाईट वाटत होतें. रथ चालूं लागला. वाटेंत आंधळा दिसला. राजाला आज राग आला नाहीं. राजा मनांत म्हणाला, 'गरीब आहे बिचारा. दिसत नाहीं त्यामुळें काय हाल होत असतील!' रथ रानाजवळ आला. राजा व प्रधानजी खालीं उतरले. ते जंगलांतून चालूं लागले. ते कालच्या झोपडीजवळ आले. साधु बाहेर आला. राजा व प्रधान यानीं साधूला नमस्कार केला. साधूनें आशीर्वाद दिला. साधु म्हणाला. 'राजा, जें झालें तें झालें. कांहीं इलाज नाहीं. अजूनहि थोडे दिवस त्रास घेशील तर सर्व कांहीं नीट होईल. मी सांगेन त्याप्रमाणें वाग.'

उद्यां सकाळींच आपल्या राज्याबाहेर निघून जा. राज्याची सर्व व्यवस्था प्रधानजी करतील. यापुढें नेहमीं चांगलें वागत जा. दुसऱ्याला मदत करीत जा. कोणालाहि त्रास देऊं नको. तूं त्रास सहन कर. असा वागलास कीं सर्व ठीक होईल. कांहीं शंका आली तर डोळे मिटून माझें स्मरण कर. राजा जा. वर्षभर चांगला वाग. तुझा हात परत येईल. सगळें कांहीं चांगलें होईल.

राजाला साधूचें बोलणें ऐकून आनंद झाला. आपला हात नीट होईल हें ऐकल्यावर राजा खूष झाला. नेहमींप्रमाणें राजानें मिशीवरून हात फिरविला. पण तो डावा हात होता.

राजानें आपलें डोकें साधूच्या पायावर ठेवलें. साधूनें आशीर्वाद दिला. राजा व प्रधान तेथून निघाले.

बाळराजानें राज्य सोडण्याचा बेत केला. प्रधानाकडे राज्याची व्यवस्था सोपविली. साधे कपडे घातले. राजा चालूं लागला. तो आपल्या राज्यापासून खूप लांब गेला. त्याला एक लंगडा भेटला. लंगडा म्हणाला, 'माझी एवढी पिशवी आपल्या खांद्यावर घेतोस काय ? मला काठी घेऊन चालावें लागतें.' बाळराजाला त्याची दया आली. तो म्हणाला, 'दे इकडे तुझी पिशवी. तूं सावकाश चल.' राजानें ती पिशवी आपल्या खांद्यावर घेतली. थोडें लांब गेल्यावर कांहीं घरें दिसूं लागलीं. लंगड्यानें आपली पिशवी घेतली. लंगडा निघून गेला.

बाळराजा चालून चालून दमला होता. तो एका घराशीं थांबला व त्यानें पाणी पिण्याला मागितलें. घरांतून म्हातारा बाहेर आला. त्यानें पाणी दिलें. त्या दोघांचें बोलणें झालें. राजानें आपलें नांव 'बाळकोबा' म्हणून सांगितलें. म्हातारा म्हणाला, 'बाळकोबा' असें करा. मी दोन दिवस दुकानावर गेलों नाहीं. माझ्या छातींत दुखतें. तुम्हीं माझ्याकडेच राहा. दुकानाचें काम करा.' बाळराजानें होय म्हटलें. पण त्यानें एक अट सांगितली. 'दिवसांतून दोन तास मी गांवांत हिंडेन आणि लोकांना मदत करीन. बाकी वेळ तुम्ही सांगाल तें ऐकेन.' म्हाताऱ्यानें ही अट कबूल केली.

बाळराजा तेथेंच राहिला. तो त्या म्हाताऱ्याचें दुकान झाडी. भाज्या नीट लावून ठेवी. पाणी काढून भाजीपाला शिंपी.

म्हाताऱ्याचें भाजीचें दुकान होतें. त्याला एक मुलगी होती. मालती तिचें नांव. अतिशय चांगल्या स्वभावाची मुलगी होती. ती सर्व कामें चांगलीं करी. तिच्यासारखी गुणी व हुशार मुलगी त्या सर्व गांवांत नव्हती. मात्र ती दिसायला अगदीं कुरूप होती. अगदीं काळा रंग. चेहऱ्यावर कितीतरी देवीचे व्रण. नाक चपटें होतें. त्या गांवांत इतकी कुरूप मुलगी दुसरी नव्हती.

पहिल्या दिवशीं तिच्या हातचें पाणी देखील राजाला घेण्याला जड गेलें. पण राजानें विचार केला यांत मुलीचा काय अपराध! बाळराजा दोन तास गांवांत फिरे. त्याचा स्वभाव आतां चांगला झाला होता. वाटेंत कांटा दिसला कीं बाजूला करी. घाण आढळली एकीकडे करी. कुणाला ओझें उचलण्यास मदत करी. कुणाचीं गुरें वळवी. कुणावरहि कधीं चिडत नसे कीं रागवत नसे. लोक म्हणत 'बाळकोबा म्हणजे देवमाणूस आहे. तोंडापुढचा घास देईल दुसऱ्याला. इतकें असून किती शांत!' असेच कांहीं दिवस गेले.

एक दिवस म्हाताऱ्याची छाती फारच दुखूं लागली. म्हातारा घाबरला. त्यानें बाळकोबाला हाक मारली. बाळकोबा जवळ गेला. म्हातारा म्हणाला, 'बाळकोबा, नीट ऐका. माझ्या मुलीशिवाय मला कोणी नातेवाईक नाहीं. माझ्या मुलीचें पुढें काय होईल हीच मला काळजी वाटते. तुमचें लग्न अद्याप झालेलें नाहीं. तुम्ही माझ्या मुलीशीं लग्न करा आणि मला या काळजींतून सोडवा.'

बाळराजाला मोठें नवल वाटलें. काय उत्तर द्यावें हेंच त्याला कळेना. इतक्या कुरूप मुलीशीं त्याला लग्न करावेंसें वाटेना. पण त्याला त्या मुलीचीहि दया येत होती. त्यानें त्या साधूचें स्मरण केलें. आणि मनांतच विचारलें. राजानें डोळे मिटले. साधूची मूर्ति पुढें उभी आहे असा त्याला भास झाला. ' लग्न करण्याचें कबूल कर ' असें साधु म्हणाला.

राजानें आपलें मन शांत केलें. तो म्हणाला, ' ठीक आहे. तुम्ही कोणतीहि काळजी करूं नका. मी आपल्या मुलीशीं लग्न करीन. तिला कोणत्याहि तऱ्हेनें त्रास देणार नाहीं.' हें ऐकून म्हाताऱ्याला अतिशय आनंद झाला.

' बाळकोबा, देव तुमचें कल्याण करील. माझ्यावर तुमचे उपकार झाले. मला कोणतीहि काळजी राहिली नाहीं. मी आतां आनंदानें मरेन. ' म्हातारा म्हणाला. मालती घरांत होती. तिनें सगळें बोलणें ऐकलें. बाळकोबासारखा चांगल्या स्वभावाचा पति मिळणार म्हणून तिला आनंद झाला. परंतु तिला आपल्या वडिलांच्या प्रकृतीची फार काळजी वाटत होती.

म्हाताऱ्याची प्रकृति जरा सुधारली. एका चांगल्या मुहुर्तावर बाळराजा व मालती यांचें लग्न झालें. कांहीं दिवसांनीं म्हातारा मरण पावला. दोघांना फार वाईट वाटलें.

एक दिवस बाळराजाच्या स्वप्नांत साधु आले. त्यांनीं सांगितलें, ' आपलें घरदार, पैसे सर्व गरिबांना वाट आणि पूर्वेच्या

बाजूला तुम्ही दोघांनीं जा. ' बाळराजा जागा झाला. जागा झाल्यावर त्यानें आपलें स्वप्न आपल्या बायकोला सांगितलें. आपली मागील हकिगतहि सांगितली.

त्याची हकिगत ऐकून मालतीला फार आश्चर्य वाटलें. ती आपल्या नवऱ्याला म्हणाली, ' महाराज तुम्ही सांगाल तें मी ऐकेन. उद्यां येथून जाऊं व रानांत देवाची भक्ति करूं. '

सकाळ झाल्यावर जवळच्या सर्व लोकांना बोलाविलें. त्यांना निरनिराळ्या वस्तु दिल्या. एका गरिबाला घर दिलें. कुणाला पैसे दिले. कुणाला कपडे दिले. कुणाला भांडीं दिलीं. सर्व लोक खूष झाले. ' बाळकोबा, तुमच्यासारखा माणूस आम्ही कोठें पाहिला नाहीं. तुम्ही खरे साधु अहां. ' लोकांना आनंद झालेला पाहून बाळराजालाहि आनंद झाला. त्यानें आपला डावा हात मिशीवरून फिरविला.

बाळराजा व मालती पूर्वदिशेनें जाऊं लागलीं. वाटेनें जातांना देवाचें नांव घेत तीं दोघें जात होतीं. जातां जातां वाटेंत त्यांना एक झोपडी लागली. या झोपडीजवळून जात असतांना त्यांना कुणाच्या तरी रडण्याचा आवाज ऐकूं आला. तीं दोघें झोपडींत आलीं. एक म्हातारा लोळत होता. त्याच्या अंगावर फो उठले होते. अंगाला घाण येत होती. बाळराजानें विचारलें ' महाराज, काय होतें आहे आपणाला ? काय करूं आम्ही ? '

अनुक्रम २८८८७ बाल वाङ्मय ११५३ नों. दि. ३१।३।५७

तो म्हणाला, ' अरे बाबा, माझ्या अंगाकडे पहा. फार आग होते रे. मला आंघोळ घाला. हळुहळु चोळा. तें भांडें घ्या आणि त्या झऱ्याचें पाणी आणा. '

बाळ राजानें झऱ्याचें पाणी आणलें. अगदीं हलक्या हातानें उचलून बाहेर नेलें. त्याच्या अंगाला अतिशय घाण येत होती. बाळ राजा व मालती या दोघांनीं त्याचें अंग हळु हळु चोळलें. मध्येंच तो म्हातारा ओरडे. अरे! कोण, माणसें अहां कीं राक्षस अहां ! केवढ्या मोठ्यानें चोळतां तुम्ही! कसें चोळावें हें सुद्धां कळत नाहीं. अगदीं मूर्ख आहांत तुम्ही. तो असा रागावे पण हीं दोघें शांत होतीं. आंघोळ झाल्यावर तो म्हणाला ' अंगणांत ती तांबड्या फुलांची वेल आहेना ! त्या पानांचा रस माझ्या अंगाला लावा. ' त्या दोघांनीं पानांचा रस काढून आणला. तो हळुहळु अंगाला लावूं लागलीं, तेव्हां तो म्हातारा ओरडला ' अरे! केवढ्या जोरानें लावतां. अगदीं दुष्ट अहां तुम्ही. ओय् ओय् ! काय दुखवलेंत ! ' त्यानें शेजारची काठी बाळ राजावर मारिली. खोंक पडून रक्त वाहूं लागलें. राजानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. राजा रागावला नाहीं.

अशा रीतीनें सेवा केल्यावर राजा निघाला. तेव्हां तो म्हातारा म्हणाला ' थांबा, तुमचा स्वभाव पाहून मी फार खूष झालों आहे. मी तुमची परीक्षा पाहिली. तुझा हात नीट होईल. असेच पुढें

समोर जा. एक मोठा साप भेटेल. त्यानंतर एका मोठ्या घराजवळ राक्षस भेटेल. आंत गेल्यावर एका सोन्याच्या डब्यांत एक लहानशी डबी आढळेल. त्यांतील मलम घे आणि परत राजवाड्यांत जा. ज्या ठिकाणीं तुझा हात गळून पडला त्या ठिकाणीं हें मलम हाताला लाव म्हणजे झालें.'

मुली तूं फार चांगल्या स्वभावाची आहेस. तुलाहि चांगलें फळ मिळेल. ईश्वर तुम्हाला यश देवो ! राजानें त्याच्याकडे पाहिलें, त्याच्या अंगावर कांहींहि नव्हतें. साधूच्या पायां पडून बाळ राजा व मालती निघाली.

बाळराजा व मालती साधूनें सांगितल्याप्रमाणें समोर जाऊं लागलीं. जात असतांना वाटेंत एक मुंगूस त्यानीं पाहिलें. मुंगूस लंगडत जात होतें. ओरडत होतें. राजा पुढें झाला. त्यानें मुंगुसाला धरलें. मुंगुसाच्या पायांत मोठा कांटा रुतला होता. मालतीनें तो हळूच काढून टाकला. जखमेवर साधूनें सांगितलेल्या पाल्याचा रस लावला. तो पाला फारच गुणकारी होता. पाल्याचा रस लावल्यानंतर पाय पूर्ववत चांगला झाला. मुंगूस म्हणालें 'हे राजा, माझ्या गळ्यांतील हा मणी काढून घे. तो आपल्या दंडांत बांध.' मालतीनें मुंगुसाच्या गळ्यांतील मणी काढला व तो राजाजवळ दिला. राजानें तो आपल्या मनगटावर बांधला.

बाळराजा व मालती पुढें चालूं लागलीं. खूप पुढें गेल्यावर त्यांना मोठा फुत्कार ऐकूं आला. तीं तशींच पुढें गेलीं. त्यांनीं एक

मोठा साप पाहिला. फार मोठा साप होता तो. त्यानें आपला फणा उभारला. त्याला पहातांच मालती घाबरली. राजा म्हणाला ' चल पुढें. तो आपणांला उगाच त्रास कां देईल ?' तीं दोघें पुढें जाऊं लागलीं. बाळराजा म्हणाला, ' हे नागराजा, आमच्या-वर कृपा कर. आम्हाला पुढें जाऊं दे ' साप म्हणाला, ' एकदम मागें व्हा. एक पाऊल पुढें टाकालँत तर गिळून टाकीन. जगायचें असेल तर पहिल्यानें मागें सरका. शेपटीचा एक तडाखा दिला तर पन्नास हात मागें जाल. मी येथें पहारेकरी म्हणून उभा आहें. कुणालाहि पुढें जाऊं देणार नाहीं.

बाळराजानें सापाला नमस्कार केला व तो जोरानें पुढें चालला. हें पाहून सापाला फार राग आला. त्यानें आपला जबडा उघडला व तो पुढें आला. इतक्यांत सापानें बाळराजाच्या मनग-टावरील मणी पाहिला. तो तसाच थांबला. त्यानें विचारलें, 'हा मणी तुझ्या मनगटावर कसा ?' यावर बाळराजानें सापाला सर्व हकिगत सांगितली. सापानें मोठ्यानें शीळ घातली. थोड्याच वेळांत तें मुंगूस उड्या मारीत धावत आलें. साप म्हणाला, 'या मनुष्याजवळ हा मणी कसा आला ?'

मुंगुसानें घडलेली सर्व हकीगत सांगितली व म्हटलें ' हा ...णूस फार दयाळु आहे. माझ्याकारितां याला पुढें जाऊं दे !' ... म्हणाला 'ठीक आहे मी त्यांना जाऊं देतों. शिवाय हा अ... देतों म्हणजे राक्षस यांना खाणार नाहीं.' सापानें

बाळराजाला ताईत दिला. बाळराजाला फार आनंद झाला व त्यानें आपला डावा हात मिशींवरून फिरविला.

तीं दोघें तशींच पुढें चाललीं. पुष्कळ पुढें गेल्यावर त्यांना एकदम मोठा आवाज ऐकूं आला.

'कोण पुढें येत आहे ? मागें व्हा नाहींतर खाऊन टाकीन.' राजानें इकडे तिकडे पाहिलें. त्यांना एक राक्षस दिसला. दोघांना फार भीति वाटली. पण काय करणार ! तीं तशींच पुढें गेल्यावर राक्षस म्हणाला, 'मागें फिरा. आणखी पुढें आलांत तर एका हातानें उचलीन आणि तोंडांत टाकीन. व्हा मागें. मी येथें पहारा करीत आहे. कोणालाहि पुढें जाऊं देणार नाहीं.'

बाळराजा कांहीं बोलला नाहीं. पण त्यानें आपल्या जवळील ताईत राक्षसाला दाखविला. चिडलेला राक्षस शांत झालेला दिसला. राक्षसाची नजर त्याच्या थोट्या हाताकडे गेली. त्यानें विचारलें, 'तुम्हाला काय पाहिजे ? तुमचा हात परत चांगला व्हायला पाहिजे काय ?' राक्षस थोडा हंसून मालतीला म्हणाला 'काय ग मुली, मी एका अटीवर या तुझ्या नवऱ्याला औषध घेऊं देईन. मला भूक लागली आहे. मी तुला खातों. कबूल आहे काय ?'

मालती म्हणाली, 'खुशाल खा. माझ्या पतीचा हात चांगला झाला म्हणजे झालें. आनंदानें खा अगदीं.' राक्षस म्हणाला

'शाबास मुली, मी तुझी परीक्षा पाहिली. तुझें नवऱ्यावर चांगलें प्रेम आहे. तुझें रूप मी बदलतों.' त्यानें आपल्या हातांतील काठी मालतीवरून फिरविली. आतां मालती अतिशय सुरेख दिसूं लागली. 'राक्षस महाराज, तुमचे उपकार झाले. मला रूपाचें कांहीं वाटतें असें नव्हे. पण राजांना शोभेशी हवी ना! माझें रूप पुन्हा बदलणार नाहीं ना?' 'नाहीं बाळ, अगदीं भिऊं नको. चला तें औषध घ्या.' राक्षस म्हणाला.

राक्षस, राजा व मालती पुढें गेलीं. तेथें सोन्याचा डबा होता. राजानें डबा उघडला. त्यांत मलमाची डबी होती ती घेतली. डबी हातीं आल्यामुळें व मालती सुंदर झाल्यामुळें राजा खूष झाला. राजा म्हणाला ' 'राक्षस महाराज, आम्ही जातों आतां. आम्ही तुमचे उपकार कधीं विसणार नाहींत.' राजानें राक्षसाच्या पायावर डोकें ठेवलें. मालतीनेंहि नमस्कार केला. राक्षसानें विचारलें, 'आतां तुम्ही कोठें जाणार?' त्यावर राजानें उत्तर केलें, 'माझें काम झालें. मी माझ्या राज्यांत जाणार.' राक्षस म्हणाला, 'वा! तुम्ही चालत जाणार! आणि पोंहचणार केव्हां? थांबा मी एका क्षणांत तुमच्या राजवाड्यांत पोहोंचवितों.' तेव्हां राजा म्हणाला, 'पण राक्षस-राज' तुम्हाला पुष्कळ त्रास होईल. आम्ही जाऊं सावकाश.'

'चला या पेटींत बसा. मी पटकन् नेतों. मला कसला आला आहे त्रास!' राक्षसानें म्हटलें. राजा व मालती पेटींत

बसलीं. राक्षसानें पेटी उचलली व भरकन राजवाड्याजवळ ठेवली. राजा बोलायच्या अगोदर राक्षस नाहींसा झाला. राजा बाहेर आला. मालतीहि पेटीबाहेर आली. राजा आलेला पाहतांच प्रधानजी पुढें आले. सर्व मंडळी जेथें हात गळाला होता त्या ठिकाणीं गेली. तेथें राजानें मलम लावलें. लगेच पहिल्याप्रमाणें हात झाला. राजाचा हात नीट झालेला पहातांच सर्वांना अतिशय आनंद झाला. राणीला पाहून सर्वांना आनंद झाला. हें पाहून राजा खूष झाला व त्यानें नेहमीप्रमाणें आपला उजवा हात मिशीवरून फिरविला.

BVBK-0404588

अनुक्रम २८८८९
विभाग बाळवाङ्मय
क्रमांक ११५३
नों. दि. ३१/३/६९
वाचनालय